पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस / ४ / कावि / ८५७ / २०१२
दिनांक - ३१ / ०५ / २०१२

प्रति,

मा.............................................
सदस्य, शहर सुधारणा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची सभा दिनांक - ०५ / ०६ / २०१२ रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक - ०५ / ०६ / २०१२ रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

\\Nagersachiv४\nnn\Nagersachiv१/shsu-११-१२\agenda४doc.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

मा. शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - ४**

दिनांक :- ०५ / ०६ / २०१२ वेळ :- दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक - ०५ / ०६ / २०१२ रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक १५/०५/२०१२ व १६/०५/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ३ ) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक १ :- मा. रामआधार धारिया, मा. गोपाळ कुटे यांचा प्रस्ताव -
पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील रेड लाईन व ब्लू लाईनमध्ये होत असलेल्या बांधकामांबाबत धोरण ठरविणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
( दिनांक - ०५ / ०६ / २०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्रमांक २ :- मा. ड प्रभाग समिती सभा दिनांक ०२/१२/२०११ ठराव क्र.५० नुसार, मौजे सांगवी येथील सर्व्हे नंबर ९ व ८४ च्या गावठाणालगतच्या जागेत पुर्वीपासून खाजगी मालकाची अनेक घरे आहेत. मंजूर विकास योजनेनुसार सदरची घरे १८ मी. व १२ मी. रस्त्यावर बाधीत होत आहेत. मंजूर विकास योजनेप्रमाणे असणारा चौक व १८ मी. रस्ता नदीकडेच्या व दक्षिणेकडील सर्व्हे नंबर ९ मधील रस्ता विकसित झालेला दिसत आहे. त्यानुसार असणारी विद्यमान घरे ही बाधीत होतांना दिसत नाही. म्हणून प्रत्यक्ष जागेवरील रस्त्याची व चौकांची आखणीप्रमाणे मंजूर विकास योजनेची रस्त्याची आखणी दुरुस्त होणे आवश्यक आहे. यासाठी म.प्रा. व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये उपरोक्त प्रमाणे फेरबदलाचा प्रस्ताव शासनाचे मंजूरीकामी पाठविण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
( दिनांक - ०५ / ०६ / २०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस / ४ / कावि / ८५७ / २०१२
दिनांक :- ३१ / ०५ / २०१२
टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.